(नोंदणी क्रमांक २१७७०) ISO 9001:2015 Certified (Reg. No. 29770)

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

The Bhabha Atomic Research Centre Employees' Co-op. Credit Society Ltd, Mumbai

R - 5 Shed, BARC Trombay, Mumbai - 400085.
Email : barc.society@gmail.com Website : http://www.barc-ecs.com

६०वा वार्षिक अहवाल
सन २०२०-२१

60TH ANNUAL REPORT 2020-21



हिरक महोत्सव
वचनपूर्ती
गौरवशाली वर्ष

The Bhabha Atomic Research Centre Employees' Co-op. Credit Society Ltd. Mumbai

26-06-2015 TO 25-06-2020
From 26-06-2020 (Extended)

Dr. M.S.Kulkarni
Ex-Officio President

Shri. Sriram S
Ex-Officio Vice President

Board of Director संचालक मंडळ

Chairman



Shri. Rajendra Madgaonkar
श्री. राजेंद्र मडगांवकर

Hon. Secretary



Shri. Sanjay R. Gawande
श्री. संजय आर. गावंडे

Vice Chairman



Mrs. Tripti Mukherji
सौ. तृप्ती मुखर्जी

Treasurer



Smt. Amrapali A. More
श्रीमती आम्रपाली ए. मोरे

Joint Secretary



Shri. S. R. Soni
श्री. एस. आर. सोनी
(Retd. on 28/02/2021)

Director



Shri. M. A. Bhaskar
श्री. एम. ए. भास्कर

Director



Shri. Sachin G. Usarkar
श्री. सचिन जी. उसरकर

Director



Shri. Vijay D. Kakade
श्री. विजय डी. काकडे

Director



Shri. Umesh K. Gaikwad
श्री. उमेश के. गायकवाड

Director



Shri.Vivek S. Dolas
श्री. विवेक एस. डोळस

Director



Shri. Gajanan N. Visal
श्री. गजानन एन. विसळ

Director



Shri. Naresh Kumar Attri
श्री. नरेशकुमार अत्री

Director



Shri. Sunil N. Khakse
श्री. सुनिल एन. खाकसे

Expert Director



Shri. C. C. Bagal (CA)
श्री. सी.सी. बागल (सीए)

Functional Director



Shri. R. K. More
श्री. आर. के. मोरे. (व्यवस्थापक)

भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

(नोंदणी क्रमांक : २९७७०)

आर-५ शेड, बीएआरसी, ट्रॉम्बे, मुंबई - ४०० ०८५

ISO 9001:2015 Certified

अधिसुचना

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आपल्या पतसंस्थेच्या अधिमंडळाची **६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.१५ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११.००वाजता** खालील कामकाजासाठी **ऑनलाईन** आयोजित केलेली आहे.व त्याचे कामकाज Unified Collaboration Service LLP यांचे कॉन्फरन्स रुम मधून दृक-श्राव्य (Audio-Video Conferencing) पद्धतीने https://www.vcnowevents.in/60AGM-barc-eccs/ या लिंकद्वारे International infotech Park, वाशी नवी मुंबई येथून सकाळी १०.४५ मि. पासून प्रसारीत केले जाईल.

सभेपुढील विषय :

१. दिनांक २७ मार्च २०२१ रोजी झालेल्या ५९ व्या ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय लेखापरिक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास मंजुरी देणे.

३. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे तसेच सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

४. शासकीय लेखापरिक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.

५. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांच्या नेमणूकीस मान्यता देणे.

६. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची व त्यासंबंधीच्या दोष दुरूस्ती अहवालाची (compliance report) नोंद घेणे.

७. अधिमंडळाच्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

८. माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार करणे.

कृपया सर्व सभासदांनी सभेस आपली ऑनलाईन उपस्थिती नोंदवावी व ऑनलाईन सभा सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती. ऑनलाईन एजीएममध्ये सहभागी होण्यासाठी कृपया खाली दिलेल्या सूचना वाचाव्यात.

दिनांक : ३१ डिसेंबर २०२१
मुंबई- ४०००८५.

सही
श्री. संजय आर. गावंडे
मानद सचिव
संचालक मंडळा करिता

- सकाळी ११.००वाजेपर्यंत आवश्यक गणसंख्या उपस्थित आढळून आली नाही तर ऑनलाईन सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित ऑनलाईन सभा त्याच दिवशी सकाळी ११.३० वाजता गणपूर्तीशिवाय घेतली जाईल आणि त्यात घेतलेले निर्णय सर्व सभासदांना बंधनकारक राहतील.

- ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतान्त व ६०वा वार्षिक अहवाल याच्या प्रती संस्थेच्या वेबसाईटवर (www.barc-ecs.com) व कार्यालयात **दि. ३१ डिसेंबर २०२१** पासून उपलब्ध होतील.
- सभेच्या विषय पत्रिकेतील विषयास अनुसरुन सभासदांना काही माहिती हवी असेल किंवा सूचना, प्रश्न सभेपुढे ठेवावयाचे असतील तर त्यांनी त्याबाबतची सूचना प्रत्यक्ष किंवा ई-मेलद्वारे लिखित स्वरुपात संस्थेत **दि.१० जानेवारी२०२२** सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत पाठवाव्यात.
- ज्या सभासंदानी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा लांभाश घेतला नसेल तर तो त्यांनी सोसायटीच्या कार्यालयीन वेळेत येऊन दि.३१.०३.२०२२ पूर्वी घ्यावा. अन्यथा असा लाभांश वैधानिक गंगाजळी निधी खात्यात वर्ग करण्यात येईल.
- ज्या सभासंदानी ६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेसाठी दि. ११.१.२०२२ पर्यंत नोंदणी केली असेल त्याच सभासंदाना कुपन दिले जाईल.

६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेत सहभागी होण्याकरिता दि.३१.१२.२०२१ ते ११.१.२०२२ पर्यंत नोंदणी करण्याबाबत :

- दि.३१.१२.२०२१ ते दि.११.०१.२०२२ पर्यंत https://www.vcnowevents.in/60AGM-barc-eccs/ या लिंकद्वारे ऑनलाईन किंवा प्रत्येक्ष संस्थेत येऊन त्यासाठी असलेल्या विहित नमून्यातील अर्ज भरुन ऑफलाईन नोंदणी करता येईल.
- सभासदांना संस्थेच्या **https://www.barc-ecs.com** या वेबसाईटवर संगणक क्रमांकाच्या आधारे त्यांचा सभासद क्रमांक पहाता येईल.

दि. १५.०१.२०२२ रोजी होणाऱ्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेत सहभागी होण्यासाठी सूचना :

- सभासदांना त्यांच्या मोबाईल नंबर, ईमेलवर ऑनलाईन सभेत सहभागी होण्याची लिंक मिळेल. सभासदांना त्या लिंकवर क्लिक करावे लागेल व लॉगिन करण्यासाठी त्यांचा सदस्यता क्रमांक प्रविष्ट करावा लागेल आणि वेबकास्टिंग/झूम - App द्वारे ऑनलाईन सभेत सहभागी होता येईल.
- ज्या सभासदांनी रजिस्ट्रेशन केले आहे. त्यांना सभेची लिंक https://www.vcnowevents.in/60AGM-barc-eccs/ ओपन करुन सकाळी १०.४५ पासून सभा संपेपर्यंत सभेत सहभागी होता येईल. व सकाळी ठिक ११.०० वाजता ऑनलाईन सभा सुरु होईल.
- ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होण्यासाठी सभासदांकडे 4G किंवा Wi-Fi internet connectivity असणे आवश्यक आहे.
- ज्यावेळी मतदानाची आवश्यकता भासेल त्यावेळी Webcasting या पोर्टलवर जाऊन मतदान करता येईल, जे सभासद zoom या App द्वारे सहभागी झाले असतील त्यानी प्रथम zoom या App मधून logout करावे. व Webcsting मध्ये login करुन त्यांना मतदान करता येईल.
- वेबकास्टिंग लिंकद्वारे कनेक्ट केलेल्या सभासदास द्विमार्ग संप्रेषणाद्वारे जोडण्यासाठी झूम मीटिंग लिंक देखील असेल. (यासाठी सदस्यांना त्यांच्या संगणकावर / मोबाइलवर झूम App डाउनलोड आणि स्थापित करावा लागेल). सभासदांना काही प्रश्न असल्यास त्याना झूम पर्यायावर हात उंचवावा लागेल व सभेच्या अध्यक्षांच्या मान्यतेने, तो / ती unmute होईल आणि मग तो / ती प्रश्न विचारू शकेल.

६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेसाठी दि. ३१.१२.२०२१ ते ११.०१.२०२२ पर्यंत नोंदणी केलेल्या सभासदांना सभेचे कुपन मिळणे व वापरणे बाबत.

- जे सभासद दि. ३१.१२.२०२१ ते ११.०१.२०२२ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात येऊन ऑफलाईन नोंदणी करतील त्यांना त्याच दिवशी सभेचे कुपन देण्यात येईल.
- जे सभासद ऑनलाईन नोंदणी करतील ते दि. ०३.०१.२०२२ ते १८.०१.२०२२ दरम्यान संस्थेच्या कार्यालयीन वेळेत येऊन स्वताचे कुपन प्राप्त करु शकतील.
- ६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेसाठी देण्यात आलेल्या कुपनची वैधता दि.१५.०१.२०२२ ते २८.०१.२०२२ पर्यंत असेल व सदर कुपन आस्थापनेच्या Canteen/tea pantry मध्ये दिलेल्या मुदतीत वापरता येईल.

THE BARC EMPLOYEE'S CO-OPERATIVE CREDIT SOCIETY LIMITED., MUMBAI
(Reg. No. 29770)
R-5 Shed, Behind RLG, BARC Trombay, Mumbai - 400 085.

ISO 9001:2015 Certified

NOTIFICATION

Notice is hereby given that 60th Annual General Body Meeting of The Bhabha Atomic Research Centre Employees' Co-operative Credit Society Ltd., Mumbai – 400 085 will be held online on Saturday 15th January 2022 at 11.00 a.m. to transact the following business. It will be broadcast from the conference room of Unified Collaboration Services LLP by Audio-Video Conferencing on link https://www.vcnowevents.in/60AGM-barc-eccs/ from International Infotech Park, Vashi Navi Mumbai from 10.45 a.m.

AGENDA

1. To read & confirm the minutes of 59th Online Annual General Body Meeting held on 27th March 2021.
2. To approve the annual report and Statutory Audited Statement of Accounts for period 1st April 2020 to 31st March 2021.
3. To approve the appropriation of profit and budget for the financial year 2021-2022 as recommended by the Managing Committee.
4. To read the Audit Reports of Internal & Statutory Auditors for the financial year 2020-2021.
5. To approve the appointment of Statutory Auditor who is appointed for the financial year 2021-2022.
6. To read the compliance report in respect of the Audit Report for financial year 2019-2020.
7. To condone absence of the members, who are not present in 60th Annual General Body Meeting.
8. To consider any other matter brought forward with the permission of the Chair.

All the members are requested to attend the ONLINE AGM and co-operate for smooth functioning of ONLINE AGM. Please refer given below instructions to participate in Online AGM.

sd/-
(Sanjay R. Gawande)
Hon. Secretary
on behalf of Managing Committee

Date: 31st December 2021
Mumbai-400 085

If there is no quorum for the 60th online AGM upto 11.00 a.m. the meeting shall be adjourned and the adjourned meeting will be held on the same day at 11.30 a.m. and the business on the agenda shall be transacted in irrespective of quorum and the decisions taken in it will be mandatory to all members.

Copies of the minutes of 59th AGM and Annual Report of 60th AGM will be made available from 31st December 2021 on the society website www.barc-ecs.com and hard copies at society office.

- If members seek any information related to meeting agenda points, they can submit personally at society office or send their questions through email in writing on society email address **barc.society@gmail.com** till January 10, 2022 up to 4.00 pm in office time.
- Members who have not yet collected their Dividend of F. Y. 2018-19, they are requested to collect their dividend on or before 31st March 2022. Otherwise Dividend amount will be transferred to Reserve Fund
- Only those members will be given coupon who have registered themselves up to 11.01.2022 for 60th Online AGM.

For 60th AGM Online Registration Process from 31.12.2021 to 11.01.2022

- The members can register online from 31.12.2021 to 11.01.2022 by visiting **https://www.vcnowevents.in/60AGM-barc-eccs/** or by visiting the Society Office and filling up the application in the prescribed form.
- The members can view their membership number on basis of Computer Code Number made available on the society website **https://www.barc-ecs.com**

60th AGM Online – Participation Process on 15-01-2022

- Members will receive a participation link on their mobile number/email address. The members have to click on the link after which they have to enter their membership number to login and participate in Online **AGM via Webcasting/Zoom Application.**
- The members who have registered for 60th online AGM have to open and access the received link **https://www.vcnowevents.in/60AGM-barc-eccs/** from 10.45 a.m. onwards till end of the Online AGM. will start sharply at 11.00 a.m.
- For participation in Online AGM member should have 4G or Wi-Fi internet connectivity.
- If required, the members can cast their online vote only through the webcasting portal. The members who are connected via Zoom App have to first logout of zoom app and connect through webcasting in order to cast their online vote.
- The Member who are Connected Via Webcasting link will also have an embedded link to connect to the Zoom meeting via two-way communication. (For this the members will have to download and install the Zoom application on their computer/mobile). If the member has any question he/she need to raise hand on Zoom option. With the approval of Chairman of the meeting, he/she will be unmuted and then he/she would be able to ask the question.

To get and use of Meeting Coupons for the members who have registered from 31.12.2021 to 11.01.2022 for 60th Annual General Online Meeting.

- Those members who will register themselves OFFLINE by visiting to Society office from 31.12.2021 to 11.01.2022 will get the coupon on same day.
- Those members who register themselves ONLINE to attend online 60th AGM can collect their coupon from Society Office from 03.01.2022 to 18.01.2022 during office time.
- The validity of the coupon of 60th Online AGM is from 15.01.2022 to 28.01.2022 and during this period it can be used at any Departmental canteen/ tea pantry

के. एन. व्यास
K. N. Vyas

भारत सरकार
Government of India

अध्यक्ष, परमाणु ऊर्जा आयोग
व
सचिव, परमाणु ऊर्जा विभाग
Chairman, Atomic Energy Commission
&
Secretary, Department of Atomic Energy



MESSAGE

The BARC Employees Co-Operative Credit Society Ltd. was established in 1961, about 6 decades ago by adopting co-operative medium to provide financial support to DAE employees. Over the years, it has grown bigger and caters towards the financial & social needs of our DAE family.

Employees Co-op. credit society must strive and focus on imparting easy access and services to all its members, especially those who are from financially weaker section, fulfilling their dreams of providing higher education to their wards or to own a house. I am very glad to know that present managing committee is working on this. Apart from providing loans/investments to members, it has also started some social responsibility of providing immediate family relief of Rs. 1 Lakh to the aggrieved family, waiving off outstanding special loan up to Rs. 12 Lakhs in case of unfortunate death of members. In recent years society has succeeded to get **ISO 9001-2015** certification and achieved prestigious award as *Best Salary Earner Society* in Maharashtra on the basis of excellent performance.

I am sure that, the occasion will inspire everyone associated with the society and will continue to stive to provide service to more than 30 units all over India of our DAE family with responsibility, accessibility and transparency.

My best wishes to Board of Directors, staff and members of our society on the occasion of celebration of Diamond Jubilee and wishing all success in its future endeavors.

(K.N. Vyas)

अणुशक्तिभवन, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, मुंबई - 400 001, भारत • Anushakti Bhavan, Chhatrapati Shivaji Maharaj Marg, Mumbai - 400 001, India
दूरभाष/Phone: +(91) (22) 2202 2543 • फैक्स/Fax: +(91) (22) 2204 8476 / 2284 3888
ई मेल/E-mail: chairman@dae.gov.in

डॉ. अजित कुमार मोहान्ती
Dr. Ajit Kumar Mohanty

भारत सरकार
Government of India

निदेशक, भाभा परमाणु अनुसंधान केंद्र
Director, Bhabha Atomic Research Centre
सदस्य, परमाणु ऊर्जा आयोग
Member, Atomic Energy Commission



* शुभेच्छा संदेश *

भाभा अणुसंशोधन केंद्र येथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या आर्थिक गरजा आवश्यकतेनुसार पूर्ण करण्याकरीता स्थापन झालेली "दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित मुंबई" या आपल्या संस्थेने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत ६० वर्ष पूर्ण केली आहेत व त्या निमित्ताने संस्था हीरक महोत्सव साजरा करीत आहे हे ऐकून खूप आनंद होत आहे.

आपल्या संस्थेने गेली ६ दशके सहकारी क्षेत्रात सभासदांना मागणीनुसार कर्ज पुरवठा व गुंतवणूकदारांना त्यांच्या भविष्यातील स्वप्ने साकार करण्याकरीता अविरतपणे सुरक्षित व विश्वसनीय कार्य केलेले आहे जे सहकारी सेवा क्षेत्रात मैलाचा दगड ठरत आहे.

सभासदांसाठी विविध योजना राबवून भागधारक सभासदांस स्थैर्य आणि आपुलकी सभासद निधी व कर्ज संरक्षण निधीच्या माध्यमातून विद्यमान कार्यकरिणीने दिवंगत सभासदांच्या कुटुंबियास जो मोठा आधार उपलब्ध करून दिला तो निश्चितच कौतुकास्पद आहे.

मागील ६ वर्षात आपल्या संस्थेने ISO 9001:2015 हे आंतरराष्ट्रीय मानांकन तसेच अनेक पुरस्कार मिळवून महाराष्ट्रातील पगारदार पतसंस्थांमध्ये जो नावलौकिक मिळविलेला आहे तो अभिमानास्पद आहे.

हीरक महोत्सवाच्या वर्षपूर्ती निमित्ताने मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करून संस्थेच्या पुढील शतक पूर्ततेच्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देत आहे.

(अजित कुमार मोहान्ती)

भाभा परमाणु अनुसंधान केंद्र, ट्रॉम्बे, मुंबई- 400 085, भारत • Bhabha Atomic Research Centre, Trombay, Mumbai 400 085, India
दूरभाष/Phone:+(91) (22) 2550 5300, 2551 1910 • फैक्स/Fax: +(91) (22) 2559 2107, 2550 5151
ई-मेल/E-mail: director@barc.gov.in

TECHNOLOGIES FOR NEW INDIA @75
आज़ादी का अमृत महोत्सव



मंत्री

सहकार, पणन

महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

www.maharashtra.gov.in

दिनांक : 3 0 NOV 2021

शुभसंदेश

"सहकारणे समृध्दी भवंतु" हे सहकार ब्रीद घेऊन, दि. बीएआरसी एम्प्लॉईज को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई ही संस्था हिरक महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. संस्थेने केलेल्या या यशस्वी वाटचालीबद्दल आपले अभिनंदन !

महाराष्ट्र हे सहकाराची भूमी आहे. पगारदार पत संस्थेमध्ये आपल्या सहकारी संस्थेने आदर्श कामकाजाचा मापदंड निर्माण केला आहे.

"भाभा अणुसंशोधन केंद्र" या भारताच्या अत्यंत गौरवशाली परंपरा असलेल्या संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विविध आर्थिक गरजा भागविणे तसेच ठेवीदारांचे हित व सामाजिक बांधिलकी जपत संस्थेने सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे.

आपली संस्था मागील ६० वर्ष राज्याच्या सहकार क्षेत्रात अग्रेसर आहे. सभासदांच्या आर्थिक प्रगती बरोबरच सामाजिक कार्याच्या माध्यमातून सामाजिक स्तर अधिक उंचावण्यासाठी संस्थेचे मोठे योगदान आहे. आपली संस्था हिरक महोत्सवी वर्षात पदार्पण करत असून त्यानिमित्त विशेष पुस्तिका प्रकाशीत होत आहे ही अभिनंदनीय बाब आहे. संस्थेच्या हिरक महोत्सवानिमित्त आणि पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

(बाळासाहेब पाटील)

के. जयकुमार
नियंत्रक
K. JAYAKUMAR
Controller



सेंट्रल कॉम्प्लेक्स,
ट्रॉम्बे, मुंबई - 400085.
Central Complex,
Trombay,
Mumbai - 400085.

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
भाभा परमाणु अनुसंधान केंद्र
BHABHA ATOMIC RESEARCH CENTRE

MESSAGE

I am happy to know that BARC Employees' Co-operative Credit Society Ltd. is celebrating its Diamond Jubilee. It is a matter of great pride that the Society which was established on November 30, 1961 has completed 60 years of yeoman service to the employees of BARC, Mumbai as well as to the employees of various other Constituent Units, PSUs and Aided Institutions under the Department of Atomic Energy. Over the years, the Society has brought out many schemes which were welcomed overwhelmingly by all sections of employees of DAE. It is heartening to note that the Society also felicitates members on superannuation and the children of employees for excellent Academic performance in 10th and 12th standards.

On the occasion of Diamond Jubilee of the Society, I extend my greetings and good wishes for its continued service to employees of BARC and other units.

K. Jayakumar
Controller

Dated : 10 December 2021

दूरभाष/Telephone : +(91) (022) 2550 5354 • फैक्स/Fax : +(91) (022) 2550 5354, 2550 5151
ई-मेल/E-mail : controff@barc.gov.in, controller@barc.gov.in

डॉ. एम. एस. कुलकर्णी
Dr. M.S. KULKARNI

सत्यमेव जयते
भारत सरकार
Government of India

अध्यक्ष, स्वास्थ्य भौतिकी प्रभाग
Head, Health Physics Division

* शुभेच्छा संदेश *

या वर्षी 'दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित मुंबई' ही आपली जिव्हाळ्याची संस्था 'हिरक महोत्सव' साजरा करत आहे ही अत्यंत समाधानकारक अशी घटना आहे. सहा दशकांपूर्वी एका मर्यादित स्वरुपात स्थापन करण्यात आलेल्या संस्थेचा आज एक वटवृक्ष तयार झाला असून संस्थेचे सभासदत्व आता पूर्ण भारत देशात व्यापलेले पहायला मिळते.

सभासदांच्या संस्थेतील ठेवी आज ५०८ कोटी रुपयांच्या घरात आहेत हे सभासदांच्या संस्थेवरील विश्वासाचे तसेच संस्थेच्या आर्थिक व्यवहार हाताळण्याच्या कार्यक्षमतेचे द्योतक आहे. संस्थेने आपल्या सभासदांना केलेले कर्जवाटपही ५८३ कोटी रुपयांच्या घरात आहे. यावरून संस्थेने आपल्या 'आधार हेतू' तसेच 'आधार मूल्ये' यांची प्रकर्षाने जपणूक केली आहे हे सिद्ध होते. संस्थेच्या या कार्यशैलीची परिणीती तिला ISO 9001– 2015 मानपत्र तसेच अत्यंत प्रतिष्ठित असा 'बेस्ट सॅलरी अर्नर सोसायटी' हा पुरस्कार मिळण्यात झाली आहे.

संस्थेची ही सर्वसमावेशक नितीमुल्ये तसेच संस्थेचा कार्यकुशल व नितीनिष्ठ कर्मचारी वृंद यामुळे संस्था अशाच प्रकारे प्रगती करत राहणार व एक आदर्श निर्माण करणार यात कोणतीही शंका नाही

माझ्या सर्व सभासदांना हार्दिक शुभेच्छा!

मुकुंद श्रीनिवास कुलकर्णी
पदसिद्ध अध्यक्ष
दि बीएआरसी एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

भाभा परमाणु अनुसंधान केंद्र, ट्रॉम्बे, मुंबई - 400 085, भारत • Bhabha Atomic Research Centre, Trombay, Mumbai 400 085, India
दूरभाष / Tel.: +91-22-2559 5076 / 2559 2665 • आवास / Res.: +91-22-2550 6096 • फैक्स / Fax : +91-22-2550 5313, 2550 5151
• ई-मेल / E-mail : kmukund@barc.gov.in

दूरभाष/Tel. : 022-2550 5330
022-2559 2050
फैक्स/Fax : 022-2550 5151
ई-मेल/E-mail : caoa@barc.gov.in

सेंट्रल कॉम्प्लेक्स,
ट्रॉम्बे, मुंबई - 400085.
Central Complex,
Trombay,
Mumbai - 400085

श्रीराम एस.
मुख्य प्रशासनिक अधिकारी (प्रशासन)
SRIRAM S.
Chief Administrative Officer (A)

सत्यमेव जयते

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
भाभा परमाणु अनुसंधान केंद्र
BHABHA ATOMIC RESEARCH CENTRE



MESSAGE

I am very happy to learn that BARC Employees' Co-operative Credit Society Ltd. is celebrating its Diamond Jubilee. I have known BARC Society since last more than 30 years. The Society has done a commendable service and continues to do so to the employees of BARC and other units by providing loans to them in a very simple and user friendly manner. It is also well known that a lot of innovative schemes are also implemented by BARC Society benefiting a large section of our employees.

On the occasion of Diamond Jubilee of the Society, I convey my sincere good wishes for a glorious future and for fulfillment of all its noble endeavors.

Sriram S.
Chief Administrative Officer (A)

Dated : 13.12.2021

अध्यक्षीय मनोगत



सन्माननीय भागधारक सभासद बंधू-भगिनींनो

हिरक महोत्सवी वर्षात आर्थिक वर्ष २०२०-२०२१ चा संस्थेचा लेख-जोखा आपल्या समोर सादर करीत असताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. सन २०२० या काळात मानव जातीने कधीही न अनुभवलेली कोरोना विषाणूच्या महामारीचा सामना केला. साथीच्या रोगाने देशाची आर्थिक स्थिती खालावत असताना सर्वच क्षेत्रात मंदीसारखी परिस्थिती उद्भवली होती, संस्थेच्या एकंदरीत व्यवसायावर त्याचा परिणाम होऊन कर्जाची मागणी व कर्ज प्रकरणे नेहमीपेक्षा खूपच कमी झाली, संस्थेकडे निधीचा साठा वाढत गेला, पर्यायाने इच्छा नसताना देखील संस्थेच्या हितासाठी गुंतवणूक थांबवण्या सारखा कठोर पण हितकारक निर्णय वेळोवेळी घ्यावा लागला. परिणामी भागधारक सभासदांची गुंतवणुकांसाठी काही गैरसोय निर्माण झाली असेल त्याबद्दल खंत वाटते. प्राप्त परिस्थिती भागधारक सभासद निश्चितपणे समजून घेतील अशी आशा व्यक्त करतो. याच अडचणीच्या कालावधीत सभासदांच्या आर्थिक गरजा लक्षात घेता व लॉकडाऊन सारख्या गंभीर परिस्थितीत संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी व सुरक्षततेचे नियम पाळत कठीण काळातही संस्थेचे कामकाज सुरु ठेवले. सभासदांसाठी ई-मेलच्या माध्यमातून कर्ज प्रकरणे, परिपक्व झालेली गुंतवणुकीवरील ठेव रक्कम, पुर्नगुंतवणूक, फायनल सेटलमेंट, कर्ज परतफेड, मोरॅटोरियम, वर्गणीवरील व्याज इत्यादी कामे सुरळीतपणे पार पाडली.

प्राप्त परिस्थितीतून जात असताना भागधारक सभासदांसाठी आनंद द्विगुणित करणारी संस्थेची वाटचाल दमदारपणे गौरवशाली हिरक महोत्सवी वर्षात पदार्पण करीत होती. संस्थेच्या या गौरवशाली इतिहासाला अनेक आजी / माजी सर्व सन्माननीय भागधारक सभासदांचा विश्वास, सर्व कार्यकारिणी मंडळातील पदाधिकाऱ्यांचे व संचालकांचे व्यवस्थापकीय कौशल्य, आस्थापना व आस्थापनेतील सर्व मान्यवर अधिकारी यांचे पाठबळ, सरकारी यंत्रणेतील सहकार विभागाचे सर्व मान्यवर अधिकारी यांचे निर्देश व नियंत्रण, सर्व व्यवस्थापक, कर्मचारी वर्गाचे अपार कष्ट व सर्व हितचिंतक यांची प्रेरणा या सामुदायिक घटकांचे विश्वसनीय योगदान प्राप्त झालेले आहे, कारण हे सर्व सामुहिक घटक सहकारी तत्वानुसार संस्थेच्या विकासासाठी स्वेच्छेने चांगले काम करीत संस्थेस व्यावसायीक वैशिष्टये वाढविण्यासाठी आणि आवश्यकते नुसार बदलांशी जुळवून घेण्यास मदत करीत असतात. म्हणूनच हिरक महोत्सवा सारखे गौरवशाली प्रारूप अस्तित्व लाभलेले आहे. या गौरवशाली वर्षात आम्ही सर्वांचे सहृदयतेने मन:पूर्वक आभार व्यक्त करीत आहे.

मागील सहा वर्षाच्या कालावधीत सहकाऱ्यांच्या मदतीने समाधानकारक सेवा देण्यात तत्पर राहून संस्थेचे आणि भागधारक सभासदांचे हित आणि कल्याण साधत निश्चितपणे संस्थेच्या विकासाच्या कारकिर्दीत नवनिर्माण केल्याचा सुखद अनुभव घेऊन आस्थापनेतून सेवानिवृत्त होत असताना विलक्षण आनंद होत आहे. संस्थेचे कामकाज हाती येताच दूरदृष्टीने संगणक प्रणाली कालसुसंगत असावी या धोरणाने केलेल्या कामाची सुरवात अनेक प्रकारच्या प्रक्रिया चौकटीतून आणि सुरक्षित मानदंडाच्या चौकटीतून उशिरा का होईना पण योगायोगाने हिरक महोत्सवी वर्षात सभासदांच्या सेवेत समर्पित करणे हे भाग्यशाली आणि आनंददायी होते. आजकाल, कोणत्याही संस्थेच्या अस्तित्वासाठी आणि वाढीसाठी माहिती तंत्रज्ञानाचा (आयटी) वापर करणे आवश्यक आहे आणि तेच बँकिंग उद्योगासह सहकारी संस्थांनाही लागू होते. कोणत्याही उद्योगात तंत्रज्ञान वापरून, संस्था ऑपरेशनल खर्च कमी करू शकतात. तसेच संस्था सभासदांना गतिमान सेवा देऊ शकतात. संस्थेसाठी नवीन कोअर बँकिंग प्रणाली कार्यान्वित केल्याने संस्था व सभासदांमधील सामान्य व्यवहारांना गती मिळण्यास मदत होईल, संस्था सेवा भविष्यात २४ X ७ साठी तत्पर असणे, तसेच नियमित व्यवहारांसाठी जलद गतीने कामे पूर्ण होणे, भविष्यात आवश्यकते नुसार व्यवसाय विस्तार होताच केन्द्रियकरणामुळे कोठून ही कोणत्याही विस्तारित ठिकाणचे व्यवहार करता यावेत, आवश्यकतेनुसार इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, एटीएम, पीओएस आणि कियोस्क सिस्टम, निधी हस्तांतरण –IMPS, NEFT, RTGS सारखे व्यवहार सुलभ होतील, व्यवहारांमधील अचूकता आणि त्रुटी कमी करण्यासाठी आणि केंद्रीकृत डेटाबेस असल्याने डेटा आणि अहवाल जलद गतीने संकलित करून सहकार विभाग आणि इतर अधिकृत एजन्सींना विविध अहवाल सादर करण्यात सुलभता निर्माण करण्याकरिता या प्रणालीचा अधिक चांगला उपयोग होईल.

संस्थेचे सन्माननीय भागधारक सभासद प्रत्येक वेळी फार विश्वासाने संस्थेबरोबर व्यवहार करीत असतात. या त्यांच्या व्यवहाराची जोखीम पाहता त्यांना त्या व्यवहाराची शहानिशा करण्यासाठी खाते पासबुक छपाई कामाच्या दिवशी नियमितपणे करून दिली जाते. तसेच या विश्वासाच्या व्यवहाराला आणखीन नवीन आयाम देत संस्थेच्या प्रत्येक व्यवहाराची शहानिशा करणारी माहिती पाऊले गणिक मिळावी ती हा चोवीस तास या करिता माहिती तंत्रज्ञानाचा आणि सोशल मीडियाचा वापर करीत सभासदांच्या सेवेस दाखल करीत असताना फारच आनंद होत आहे. हिरक महोत्सवाचे औचित्य साधून सदरची माहिती ही संस्थेच्या नवीन वेबसाईट वरून व व्हाट्सॲप या सोशल मेडिया वरून तसेच संस्थेमध्ये कि ऑस्कची स्थापना करून देत आहोत. निश्चितपणे सभासदांना सदर सुविधा निर्माण करून संस्थेतील स्थानिक सभासदांबरोबर डी ए ई च्या अन्य राज्यातील संस्थेच्या सभासदांसाठी विशेष आनंद देणारी आणि संस्थे प्रती अधिक विश्वास

निर्माण करणारीही सेवा सभासदांच्या व्यवहारांना सुलभता आणि गती देणारी ठरेल, हिरक महोत्सवी वर्षातील सुंदर सेवा समर्पण अर्पित करीत असे म्हणून उशिरा का होईना पण नवीन संगणक प्रणालीची गोडफळे उपभोगावयास खऱ्या अर्थाने सुरुवात झालेली आहे.

सर्व सन्माननीय भागधारक सभासदांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करीत आहे. प्रचंड मोठ्या विश्वासाने संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी विश्वस्थ म्हणून माझ्या संघाची निवड केलीत. आपण दिलेले एक मत मी कर्ज रूपाने डोक्यावर ठेवून त्याची व्याजासहीत परतफेड केल्याशिवाय राहणार नाही असे वचन मागील निवडणुकीत मी दिले होते, त्याची पूर्तता मी माझ्या संघ सहकाऱ्यांच्या सहकार्याने केली. सभासदांच्या हितासाठी, सभासदांच्या कल्याणासाठी, सभासदांच्या आर्थिक अडीअडचणींना सहज सुलभता निर्माण करण्यासाठी, सभासदांच्या मौलिक योगदानातून निर्माण झालेल्या वटवृक्षाचा आर्थिक डोलारा सांभाळण्यासाठी, ''परिवर्तन की एक लेहर लायेगी खुशियाली की लहर" "शेअर होल्डरकरे पुकार मडगांवकर पॅनल अबकी बार ....म्हणून तुम्ही दिलेली संधी अनेक आव्हानांना सामोरे जात भागधारक सभासदांच्या आणि संस्थेच्या प्रति असलेल्या तळमळीतून सहकाराच्या अपेक्षांच्या मंडपाला अनेक निर्णयांची झालर आणि सुविधांची तोरणे लावून सुरक्षतेचे आणि समाधानाचे रिंगण तयार करू न आस्थापनेतून सेवानिवृत्त होत असताना मनस्वी आनंद होत आहे.

आपल्या सर्वांचा विश्वास, संघसहकाऱ्यांचे सहकार्य, आस्थापना आणि मुख्य अधिकाऱ्यांचे पाठबळ, हितचिंतकांची प्रेरणा, कर्मचाऱ्यांचे योगदान, सहकारी व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन या सर्वांच्या सामूहिक शक्तीने हे शक्य झाले आहे. आज जरी मी बी.ए.आर.सी. आस्थापनेतून निवृत होत असलो तरी भविष्यात देखील माझ्या संघ सहकाऱ्यांसोबत सभासदांच्या सेवेसाठी 24 तास उपलब्ध असेन असे वचन देऊन आपल्या सर्वांचे पुन:श्चमन:पूर्वक आभार मानतो व आपली रजा घेतो.

जयमहाराष्ट्र... जयसहकार...

आपला नम्र
श्री. राजेंद्र मडगांवकर
अध्यक्ष

५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमधील संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री अनंत वजरेकर यांचे भाषण



सर्वप्रथम मी सर्व सभासद, सर्वभागधारकांचे संस्थेच्या ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेमध्ये सहर्षस्वागत करत आहे . संस्थेची स्थापना होऊन आज साठाव्या वर्षात आपण पदार्पणकेलेले आहे. विशेष म्हणजे वेगळे वैशिष्ट्य घेऊन आपण या सभेस सामोरे जात आहोत. गेल्या वर्षात आपण covid-19 सारख्या भयावह महामारीच्या संकटातून गेलो आहोत. आजही करोनाचे ते संकट आपल्या समोर आवासून उभे आहे. प्राप्त परिस्थितीतून जाताना आपल्या जीवन शैलीमध्ये अनेक बदल आपण स्वीकारले आहेत. त्यामुळे पारंपारिक एकत्र समूहाने जमून होणारी सर्वसाधारण सभा आज व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमातून आपल्याला घ्यावी लागत आहे. हा बदल देखील आपण सहजपणे स्वीकारला. तसेच आजची ही सर्वसाधारण सभा आपल्याला एक वेगळा अनुभव देईल अशी मी आशा व्यक्त करतो आणि ही ऐतिहासिक सभा व्यवस्थित पार पाडण्यात आपण सहकार्य कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो व खात्री बाळगतो.

आज अतिशय आनंद होत आहे आपल्या जिव्हाळ्याने संस्थेच्या साठाव्या वर्षात पदार्पण करीत आहोत. जवळ जवळ ६४४ कोटींची वार्षिक उलाढाल टप्पा आपण पार केलेला आहे ते आपल्या सर्वांच्या सहकार्याने. संस्थेची दमदार वाटचाल सर्वांसाठी स्थैर्य निर्माण करणारी आहे. सहकाराच्या वाटेवरील खऱ्या अर्थाने समृद्धीच्या पाऊलखुणा आहेत म्हणून संस्थेचे ब्रीदवाक्य "सहकारणे समृद्धि भवतु" हे सार्थ ठरत आहे. ही प्रचंड मोठी मजल आहे, फार मोठा प्रवास आहे, निश्चितच या सहकाराच्या वटवृक्षाच्या छायेखाली सर्व सभासदांच्या गरजांचे संवर्धन आणि संरक्षण प्राप्त होईल. या ६० वर्षात सहकाराची जाणीव असलेले सर्व आजी माजी संचालक तसेच अनेक सभासद यांनी वेळोवेळी या सर्वसाधारण सभेस संबोधित करून संस्थेस व संचालक मंडळास मार्गदर्शन व योग्य दिशा दिलेली आहे. मात्र या आजच्या सभेस काही मर्यादा आहेत. आधुनिक युगातील तंत्रज्ञानाचा आधार घेत आपल्याला सभेचे कामकाज चालवावे लागेल. त्यामुळे आपल्या सर्वांना संयमित असणे गरजेचे आहे, जेणेकरून पहिल्यांदाच अशा या ऑनलाईन होणाऱ्या सभेमध्ये सभेचा प्लॅटफॉर्म हा सर्वांसाठी फायदेशीर ठरून सभेचे कामकाज पार पडण्यास मदत होईल. COVID-१९ चा काळ सर्वांसाठी अतिशय वाईट आणि त्रासदायक झाला आहे. तसाच तो जीवन जगण्यासाठी नवी दिशा देऊन जात आहे. प्राप्त परिस्थितीमध्ये आपण सर्वांनी स्वत:ची, कुटुंबाची अतिशय चांगल्या प्रकारे काळजी घेतलेली असेल, अजूनही स्थिती फारशी चांगली नाही. स्वत:ची आणि कुटुंबाची जबाबदारीने काळजी घ्या, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित रहा. या दरम्यान या गोष्टींचा अवलंब करावासा वाटतो कारण संचालक मंडळाने करोना काळात करोना विषाणूच्या लॉकडाऊनच्या काळात सुद्धा सभासदांची सेवा अविरतपणे सुरू ठेवली. तसेच सभासदांच्या हिताचे आणि फायद्याचे निर्णय घेऊन अडचणीच्या काळात त्यांना आर्थिक उणीव भासू दिली नाही. याबद्दल सर्व सभासदांचे आणि कार्यकारी मंडळाचे अभिनंदन आणि धन्यवाद.

दिनांक: २७ मार्च २०२१

५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमधील संस्थेचे अध्यक्ष श्री राजेंद्र मडगांवकर यांचे भाषण



महाराष्ट्राचे आराध्यदैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, बीएआरसी आस्थापनाचे जनक डॉक्टर होमी जहांगीर भाभा यांना विनम्र अभिवादन करून आजच्या या ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाइन सभेत उपस्थित असलेले संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष आदरणीय अंनत वजरेकर साहेब, लवकरच सामील होणारे संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष आदरणीय श्रीराम साहेब, संस्थेच्या उपाध्यक्षा श्रीमती तृप्ती मुखर्जी, संस्थेचे मानद सचिव श्री संजय गावंडे, सहसचिव श्री एस आर सोना, उपस्थित सर्व संचालक, सभासद बंधुभगिनींनो आणि माऊलींना, संस्थेच्या इतिहासामध्ये सर्वप्रथम होणारी ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभा यास चेअरमन म्हणून संबोधित करण्याचा सन्मान मला मिळत आहे याचा मला अत्यानंद होत आहे. मागच्या वर्षी माझ्या काही हितचिंतकांनी उपहासात्मक टिपणी केली होती की तुमची ही शेवटची वार्षिक सर्वसाधारण सभा आहे. निश्चितच मी तेही आनंदाने स्वीकारले. परंतु आज या संस्थेचे हीरक महोत्सवीवर्ष आहे. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये माझी काहीही चूक नसताना मला माझ्या सहकाऱ्यांनी माझ्यावर अविश्वासाचा ठराव सादर करून माझी चेअरमनशीप हिरावून घेतली. म्हणूनच आज संस्थेच्या हिरक महोत्सवी वर्षामध्ये या संस्थेचे चेअरमन पद भूषवण्याचा सन्मान मला मिळत आहे. मागील पाच वर्षांमध्ये या संस्थेस प्रगती पथावर नेत असताना मला माझ्या सहकाऱ्यांनी जसा त्रास दिला गेला त्याचे आपण सर्व सभासद साक्षीदार आहात. या संस्थेमध्ये असा एक समूह आहे की ज्यांना प्रत्येक चांगल्या गोष्टीत अडचण निर्माण करून या संस्थेची प्रगती थांबवायची आहे. सभासदांचे अकल्याण करायचे आहे. जसा पोपटाचा जीव त्याच्या कंठात असतो तसाच इथे काही समूहाचा जीव या आर्थिक संस्थेमध्ये आहे. त्याचे कारण मला समजू शकत नाही. मागील पाच वर्षांमध्ये या संस्थेचे काम करत असताना माझे अर्धे सहकारी आज म्हणत आहेत की मडगांवकर आम्हाला पुढची निवडणूक लढवायची नाही. वास्तविक मी त्यांना आग्रहाची विनंती करीत आहे की सभासदांसाठी ही निवडणूक लढवणे गरजेचेआहे. संस्थेने यावर्षी प्रथमच संकल्प सिद्धी दिनदर्शिका प्रसिद्ध केली त्याचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे कारण सभासदांना आवश्यक असलेली सर्व उपयुक्त माहिती आहे. त्यात दिलेली आकडेवारी पाहून सभासद म्हणत आहेत आकडेवारी ते देऊ शकतात ज्यांचा कारभार पारदर्शक आहे. म्हणूनच माझे पदाधिकारी, संचालक मुकुंद भास्कर, सचिन उसरकर, उमेश गायकवाड, विवेक डोळस, विजय काकडे, अत्री, गजानन मिसळ, निवृत्त संचालक संस्थेचे माजी चेअरमन जनार्दन पवार याचा मला सार्थ अभिमान आहे. यावर्षी देखील वार्षिक अहवालाचे मुखपृष्ठ मुकुंद भास्कर यांनी तयार केले आहे. या मुखपृष्ठावर त्यांनी दिपस्तंभ साकारला आहे. संस्थेच्या सभासदांच्या हितासाठी ज्या कामांची, निर्णयांची अंमलबजावणी केली त्याचा सारांश या मुखपृष्ठावर आहे. या संस्थेचा दिपस्तंभ महाराष्ट्रातील अनेक पतसंस्थांना दिशा दाखवल्या शिवाय राहणार नाही अशी आशा व्यक्त करतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

दिनांक: २७ मार्च २०२१

सन्माननीय सभासद बंधु आणि भगिनीनों,

३१ मार्च २०२१ अखेरचा वार्षिक अहवाल, अंतर्गत आणि वैधानिक लेखापरिक्षित ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक व पुढील वर्षासाठीचे अंदाज पत्रक आपल्या मान्यतेसाठी सादर करताना आम्हांला आनंद होत आहे. ३० नोव्हेंबर २०२१ रोजी आपली संस्था ६१ व्या वर्षात मोठ्या जोमाने व उमेदीने पदार्पण करुन बी.ए.आर.सी. व डी.ए.ई. च्या कुटुंबाची ६० वर्ष अविरत सेवा देण्याचे काम पूर्ण केले आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे व पतसंस्थेवरील दृढ विश्वासामुळे संचालक मंडळाने केलेल्या प्रयत्नांचा व प्रगतीचा गोषवारा पुढीलप्रमाणे आम्ही मांडीत आहोत.

१. **नफा विभाजन** : अहवाल वर्षात एकूण रोख रु.१४,४०,१४,१२८/- इतका निव्वळ नफा झाला. त्यात मागील शिल्लक रु. ९,७८,१४४/- मिळवून अहवाल साली पतसंस्थेस नफा विभागणीस एकूण रु.१४,४९,९२,२७२ /- इतकी रक्कम उपलब्ध झाली. त्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्यासाठी संचालक मंडळ शिफारस करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी.

नफा रु. रु.१४,४०,१४,१२८/- वर २५% गंगाजळी	रु.	३,६०,०३,५३२.००
भाग रकमेवर १५% लाभांश	रु.	४,५९,६९,९४८.००
बोनस - भविष्य सहाय्य निधी योजना	रु.	९,४५,११९.००
लाभांश समानाधिकरण निधी	रु.	५,००,०००.००
वैधानिक तरलता निधी	रु.	६,१५,००,०००.००
शिल्लक नफा पुढील वर्षासाठी वर्ग केला	रु.	७३,६७३,००
एकूण		**रु.१४,४९,९२,२७२.००**

२. **सभा: (अ) वार्षिक सर्वसाधारण सभा** : संस्थेची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २७ मार्च २०२१ रोजी Unified Collaboration Service LLP यांचे कॉन्फरन्स रुम मधून दृक-श्राव्य पद्धतीने International Infotech Park वाशी नवी मुंबई येथे पार पडली. ऑनलाईन सभेला एकूण ६२३८ सभासद ऑनलाईन उपस्थित होते. या उपस्थित सभासदांना खादी ग्रामोद्योग यांचे रुपये ५००/- चे एस एम एस द्वारे ऑनलाईन कुपन वितरीत करण्यात आले होते.

(ब) **संचालक मंडळाच्या सभा** : अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १२ मासिक सभा व २१ विशेष सभा झाल्या. सर्व सभांना संचालकांची जास्तीत जास्त उपस्थिती होती.

३. **लाभांश व वर्गणी वरील व्याज** : अहवाल वर्षात संचालक मंडळ भाग रकमेवर सहकार खात्याने घालून दिलेल्या मर्यादेस अधिन राहून कमाल १५% लाभांश तसेच सभासद वर्गणीवर पहिल्या १५,०००/- रकमेवर १५% व उर्वरित रकमेवर १०% व्याज जाहीर करीत आहे.

४. **क्रियाशील सभासद** : अहवाल वर्षात एकूण ३२८ नवीन सभासद झाले. ७६१ सभासद राजीनामा, निवृत्ती, मृत्यू इत्यादी कारणाने कमी झाले असून दिनांक ३१ मार्च, २०२१ अखेर सभासद संख्या २०७८५ इतकी आहे.

५. **भाग भांडवल** : अधिकृत भाग भांडवल रु. ५० कोटी आहे. ३१ मार्च २०२१ अखेर वसूल भाग भांडवल रु. ३०,०६,६३,०००/- इतके झालेले आहे.

६. **वैधानिक राखीव निधी** : ३१ मार्च, २०२० अखेर वैधानिक राखीव निधी रु. १९,२०,०३,९४२/- इतका होता. त्यामध्ये अहवाल वर्षात गतवर्षीच्या नफा विभागणीतून रु. ३,५८,३०,७४१/- जमा झाले रु.३२,८००/- प्रवेश शुल्क व रु. ५,९६,५१२/- न घेतलेला सन २०१६-२०१७ चा लाभांश असे मिळून ३१ मार्च २०२१ अखेर वैधानिक राखीव निधी रु.२२,८४,६३,९९५/- इतका झाला आहे.

७. **ठेवी** : दरवर्षी सभासदांकडून अहवाल वर्षातही ठेवी ठेवण्यास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे :

१ एप्रिल, २०२० रोजी प्रारंभिक शिल्लक	रु. ४८७,३३,०३,९०९.००
अहवाल वर्षात जमा झालेल्या ठेवी	रु. ३७५,७०,९३,७६२.००
अहवाल वर्षात परत केलेल्या ठेवी	रु. ३५४,४९,७७,०२५.००
३१ मार्च २०२१ अखेरच्या शिल्लाक ठेवी	**रु. ५०८,५४,२०,६४६.००**

एकूण ठेवींशी मुदत ठेवींचे शेकडा प्रमाण ५०.६५% आहे तर सभासद वर्गणीचे शेकडा प्रमाण ३६.६५% इतके आहे.

८. **कर्ज** : दरवर्षीप्रमाणे सभासदांकडून अहवाल वर्षातही कर्ज उचल करण्यास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

१ एप्रिल २०२० रोजी प्रारंभिक शिल्लक कर्ज	रु. ५९६,५०,७१,६५६.००
अहवाल वर्षात कर्ज वाटप	रु. २४८,१९,४२,६६३.००
अहवाल वर्षात वसूल झालेले कर्ज	रु. २६०,८३,१८,३३५.००
३१ मार्च २०२१ अखेरचे शिल्लक कर्ज	**रु. ५८३,८६,९५,९८४.००**

एकूण कर्ज रक्कमेशी कर्ज वसूलीचे शेकडा प्रमाण ४४.६७% इतके आहे.

९. **संड्री खाते** : दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर संड्री खात्यात रु. १,८५,१०,६०३/-इतकी रक्कम शिल्लक होती. अहवाल साली संड्री खात्यामध्ये रु.१८,७१,५२,८९५/- इतकी रक्कम जमा झाली. अहवाल साली प्रयत्न करुन रक्कम देय असलेल्या सभासदांना रु. १७,९७,०२,३९५/- इतकी रक्कम परत करण्यात आली.

१०. **मृत्यू सहाय्य निधी** : अहवाल वर्षात या निधीमधून ५५ मृत सभासदांच्या वारसांना (सन २०२०-२१ मधील ५३ सभासद आणि मागील वर्षामधील २ सभासद) एकूण रक्कम रु. ८,१५,०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात आले.

११. **क्लिन कॅश कर्ज सुविधा** : मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून दिनांक ०१.०१.२०२१रोजी आपल्या पतसंस्थेस रु. ३५ कोटींची क्लिन कॅश कर्ज सुविधा मंजूर झाली आहे. सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मंजूर केलेल्या क्लिन कॅश कर्ज सुविधेबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

१२. **<u>सभासद आपुलकी निधी योजना</u>** : संस्थेकडे ३१.०३.२०२१ पर्यंत अहवाल वर्षात सदरच्या योजनेत सामील असलेले एकूण ५५ सभासद मृत झाल्याची नोंद झाली पैकी यामध्ये मागील वर्षातील देय असलेले ५ मयत सभासद अधिक अहवाल सालात ४८ मयत सभासदांच्या कायदेशीर वारसास सभासद आपुलकी निधी अंतर्गत एकूण ५३ सभासदांना, सभासद आपुलकी निधी योजनेतील प्राप्त झालेल्या वर्गणीतून प्रत्येकी रु. १ लाखाची मदत धनादेश, आरटीजीएस, तात्काळ बँकेद्वारा देण्यात आली. या योजनेचा तपशील पुढील प्रमाणे :

१ एप्रिल २०२० रोजीची शिल्लक निधी	रु.	१९,५३,५६४.००
अहवाल साली वर्गणीद्वारे जमा झालेला निधी	रु.	५१,४२,७३०.००
अहवाल साली जमा केलेले व्याज	रु.	५,६०,७०४.००
गतवर्षीचे देणे बाकी अदा करण्यात आले	रु.	५,००,०००.००
अहवाल सालातील दिवंगत सभासदांना आर्थिक मदत	रु.	४८,००,०००.००
आर्थिक वर्षातील दिवंगत सभासदांना देणे बाकी	**रु.**	**२,००,०००.००**
३१ मार्च २०२१ अखेर शिल्लक असलेली रक्कम	**रु.**	**२१,५६,९९८.००**

खालील सभासदांच्या वारसांस रु. एक लाखाचे धनादेश देण्यात आले.

अनु. क्र.	दिवंगत सभासदाचे नांव	संगणक क्र.	अनु. क्र.	दिवंगत सभासदाचे नांव	संगणक क्र.
१	श्री. पी.के.एस. भगत	HM//2848	२८	श्री. ए. आर. कोतवाल	NG/412/0028
२	श्री. महेश दुबे	RA/122/2198	२९	श्री. के. डी. मिश्रा	NG/305/0794
३	श्री. सुनील एस. पवार	CS/254/0272	३०	श्री. प्रकाश पी. साळवी	NG/109/0027
४	श्री. अनिल ए. कांबळे	NG/309/0012	३१	श्री. आर. आर. मेहता	RA/120/4301
५	श्री. कैलाश चंद्रा	RA/121/4543	३२	श्री. बबन के.चंदनशिवे	NG/107/1680
६	श्री. व्ही. एम. राव	NH//5326	३३	श्री. दिनेश गहलोत	RA/122/3411
७	श्री. संजय पी. पारधी	NG/402/1765	३४	श्री. पवन विश्वकर्मा	TP/924/0546
८	श्री. एस. के. अंबेकर	NG/107/1350	३५	श्री. शिव प्रसाद मेहरा	RA/170/2823
९	श्री. जी. के. दांबले	NG/405/1670	३६	श्री. केशरनाथ	RA/122/1001
१०	श्री. एस. सी. निकारगे	NG/107/1356	३७	श्री. आर. पेरीयास्वामी	NG/202/0311
११	श्री. गजानन व्ही. चिंबईकर	NG/406/1831	३८	श्री. हरेश्वर बी. केणी	TA/111/6177
१२	श्री. समीर कुमार गिरी	OC//5984	३९	श्री. एच. आर.भट्ट	NH//5535
१३	श्री. सुरेश बी. राठोड	NG/109/0069	४०	श्री. पी. एस. राव	OD//8358
१४	श्री. मनोहर एस. केणी	NG/103/0821	४१	श्री. सी. एस. श्रीनिवास	AB//5948
१५	श्री. अरुण एन. गर्जे	NG/109/0079	४२	श्री. अशोक पाटील	RA/122/2996
१६	श्री. रतनलाल बी.	HK//0591	४३	श्री. एस. डी. पागधरे	TA/111/6339
१७	श्री. रमेश एफ. सुर्यवंशी	NG/434/0019	४४	कु. भारती बी. चव्हाण	NG/102/2970
१८	श्री. राजू एम. दाभाडे	NG/106/1023	४५	श्री. मनोरंजनकुमार	DP//00959
१९	श्री. एस. शंकरराव	NH//5670	४६	श्री.अशोककुमार डी. एच.	HK//1557
२०	श्री. जयराम के. मोरे	AE//00117	४७	श्री. राजेंद्र एम. साळवे	DP//00680
२१	श्री. दिपक व्ही. आम्ब्रे	NG/108/0221	४८	श्रीमती मनिषा बी. परदेशी	NG/103/0907
२२	श्री. डी. जे. शिंदे	NG/109/0007	४९	श्री.महावीर डी. रिदलन	NG/426/0010
२३	श्री. ए. व्ही. पाटील	NG/619/0007	५०	श्री. सुनील एस. म्हात्रे	DA//0766
२४	श्री. ए. एल. मंथरू	NG/532/0082	५१	श्री. विजय सिंग	NG/605/0159
२५	श्री. काशीनाथ वाय. डोले	NG/203/0810	५२	श्री. व्ही. के. कदम	NG/108/0226
२६	श्री. प्रभुनंद तांबे	RA/122/0381	५३	श्री. ए. एस. कांबळे	NG/108/0262
२७	श्री. मनोजकुमार मुंद्रा	RA/170/9950			

१३. **सभासद कल्याण निधी** : सदर निधी अतंर्गत अहवाल वर्षात खालील उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आले.

१. **सन्माननीय सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार** : गतवर्षीच्या सर्वसाधारण सभेत सभासदांनी मागणी केल्यानुसार ज्या सभासदांनी आपल्या सभासदत्वाची १५ वर्षे पूर्ण केली आहेत अशा सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांना संस्थेत आमंत्रित करुन दि. ३१ मार्च, २०१९ पासून त्यांच्या सभासदत्वाच्या अटीनुसार रु. ३,५०१/- ते ५,००१/- इतकी रक्कम तसेच धनादेश, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्मृतीचिन्ह व मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येत आहे. अहवाल साली एकूण ४८९ सभासदांना सन्मानित करण्यात आले.

